शुक्रवार दि.१५ नोव्हेंबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ६९

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
# दैनिक लोकनेता
बीड
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

# काँग्रेसने आरक्षण रद्द केले तर आम्ही रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करू-रामदास आठवले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

काँग्रेस नेते राहुल गांधी अमेरिकेत जाऊन संविधान आम्ही संपुष्टात आणू असे सांगत आहे. पण आरक्षण कोणाला संपवता येणार नाही. आरक्षण लाभ समाजातील सर्व घटकांना मिळत आहे. काँग्रेसने आरक्षण रद्द केले तर आम्ही त्याविरोधात रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करू. आरक्षण लाभ समाजातील विविध घटकांना झाला आहे.
शरद पवार जातीचे राजकारण करत नसले तरी त्यांच्या काळात दलितांवर मोठ्या प्रमाणात अन्याय झाला आहे. कोणी जातीचे राजकारण करू नये तर सर्व समाजात एकोपा राहील असे राजकारण करावे असे मत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले. यावेळी भाजप प्रवक्ते संदीप खर्डेकर, पश्चिम महाराष्ट्र माध्यम प्रमुख अमोल कविटकर, आरपीआय पदाधिकारी संजय सोनवणे, परशूराम वाडेकर, ॲड मंदार जोशी , एम. शेवाळे उपस्थित होते.
रामदास आठवले म्हणाले, लोकसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणात गैरसमज समाजात आघाडीच्या नेत्यांनी पसरवला त्यामुळे अपेक्षित यश आम्हाला मिळाले नाही. पण जनतेस आता वस्तुस्थिती माहिती झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे संविधान बदलणार नसून ते मजबूत करण्याचे काम करत आहे. राज्यात महायुतीला १७० जागा मिळतील अशी अपेक्षा आहे. निवडणूक आयोग पथक प्रचारास नेते फिरत असताना त्यांच्या हेलिकॉप्टर मध्ये बॅग तपासणी करते. त्यामुळे उध्दव ठाकरे हे केवळ त्यांच्या बॅग तपासणी केली जात असल्याचा कांगावा करत आहे तो चुकीचा आहे. निवडणूक पारदर्शकपणे पार पडल्या पाहिजे. अशा गोष्टींना ठाकरे यांनी सामोरे जावे त्याचे राजकारण चुकीचे करू नये. देशात नरेंद्र मोदी यांना जनतेने तिसऱ्यांदा निवडून दिलेले आहे.रामदास आठवले पुढे म्हणाले, पुढील पाच वर्ष ते सत्तेत राहणार असल्याने राज्यात देखील महायुती सरकार येणे आवश्यक आहे. आम्हाला दोन जागा मिळाल्या आहे आणखी चार ते पाच जागा अपेक्षित होत्या. सत्ता आल्यावर महामंडळ, मंत्री पद आम्हाला दिले जाईल असे युतीच्या नेत्यांनी सांगितले आहे. आमचे जे नाराज कार्यकर्ते असतील त्यांनी कामाला लागावे. माझ्या पक्षात बंडखोरी प्रमाण कमी आहे. यापुढे आमच्यावर अन्याय होणार नाही याची दक्षता घेतली जाईल. १२ वर्ष मी महायुती सोबत आहे पण माझ्या पक्षास एकही आमदारकी दिली गेली नाही. माझे मंत्रालय ६९ हजार कोटी रुपयांचे आर्थिक नियोजन करत आहे. महायुती नेते राज्यात निवडणूक प्रचारात फिरताना पुन्हा सत्ता येईल असे दिसून येत आहे. काही जागांवर मैत्रीपूर्ण लढत होत आहे त्यामुळे नेमके कोणता पक्ष निवडणूक लढत आहे हे समजत नाही. मी माझ्या पक्षास मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहे. ईशान्य भारतात देखील माझे लोकप्रतिनिधी निवडून आले आहे.



# अखेर निवडणूक कर्तव्यात कसूर करणारा महसूल सेवक झाला निलंबित

## बुलढाणा जिल्ह्यातील पहीली घटना!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

सिंदखेड राजा विधानसभा निवडणुक अंतर्गत त्या अनुषंगाने दिनांक १२/११/२०२४ आणि १३/११/२०२४ रोजी मतदान यंत्र सिलिंग च्या कामकाजासाठी श्री. परमेश्वर राठोड, महसूल सेवक तहसील कार्यालय देऊळगाव राजा यांचा आदेश निर्गमित करण्यात आला होता त्यानुसार श्री राठोड हे निवडणूक कर्तव्यावर हजर राहणे अपेक्षित होते परंतु ते उक्त नमूद दिनांकास कार्यालयाला कोणतीही पूर्व सूचना न देता गैरहजर राहिले असल्यामुळे तसेच त्यांना भ्रमणध्वनी वरून वारंवार संपर्क केला असता त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही यावरून त्यांनी निवडणूक



कर्तव्यात जाणीवपूर्वक कसूर केल्याचे दिसून आल्यामुळे मा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या आदेशाने आज दिनांक १४/११/२०२४ रोजी निलंबित करण्यात आले आहे.
श्री राठोड यांनी निवडणूक विषयक अत्यंत महत्वाच्या कामकाजात जाणीवपूर्वक निष्काळजीपणा आणि कसूर केल्याचे सकृतदर्षनी निदर्शनास आले असल्याने व महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तवणूक ) नियम १९७९ चे नियम ३ चा भंग केलेला आहे आणि महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील ) नियम १९७९ चे नियम क्रमांक ४ अन्वये श्री राठोड यांना या आदेशाच्या दिनांकापासून शासन सेवेतून निलंबित करून त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येत आहे.सदर निलंबन कालावधीमध्ये श्री राठोड यांचे तहसील कार्यालय देऊळगाव राजा हेच मुख्यालय असेल.

## साहेबराव नंदन यांना जिवन गौरव तर

# परिसस्पर्श कादंबरीस निळूभाऊ फुले साहित्य गौरव पुरस्कार जाहीर


■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**ताहाराबाद । प्रतिनिधी**

साहित्यिक कवी लेखक गावगाडाकार श्री साहेबराव तात्या नंदन नाशिक लिखित, ज्ञानसिंधु प्रकाशन प्रकाशित, सौ. पुष्पलता



पगारे यांच्या जिवनावर आधारीत ग्रामिण बाजाची मनोवेधक, रंजक अल्पचरित्रपर परिसस्पर्श कादंबरीसस माणूसकी मल्टीपर्पज फाउंडेशन मलकापूर जि. बुलडाणा महाराष्ट्र राज्य यांचा राज्यस्तरीय निळूभाऊ फुले साहित्य गौरव पुरस्कार २०२४ नुकताच जाहिर झाला असून, वसुनंदिनी फाऊंडेश जळगाव यांचा राज्यस्तरीय बहुमानांकित जिवन गौरव पुरस्कार श्री साहेबराव नंदन यांना नुकताच जाहीर झाला आहे तशा आशयाचे निवड पत्र दोन्ही संस्थाच्या अध्यक्षांनी प्रसिद्धीस दिले आहे.




८ डिसेंबर २०२४ रोजी जिवन गौरव पुरस्कार सोहळा जळगाव येथे संपन्न होणार असून, १५ डिसेंबर २०२४ रोजी परिसस्पर्श कादंबरीचा राज्यस्तरीय निळूभाऊ फुले साहित्य गौरव पुरस्काराचे वितरण मलकापूर जि. बुलडाणा येथे करण्यात येणार आहे.
दोन्ही पुरस्काराचे स्वरूप मानाचा फेटा शॉल श्रीफळ बुके गौरव पत्र ट्रॉफी असणार आहे. कादंबरी साठी व व्यक्तिगत मानाचे दोन्ही राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्या बद्दल उत्तर महाराष्ट्रात साहित्य क्षेत्रात आनंद व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या निवडीचे विविध राजकीय सामाजिक शैक्षणिक सांस्कृतीक आध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवरांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष अभिनंदन केले आहे. या आधी साहेबराव तात्या नंदन यांना साहित्य क्षेत्रातले शेकडो सन्मानपत्रे , मानाचे राज्यस्तरीय अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. पुरस्कार्थी तात्यांचे ,ड बापूसो. संभाजीराव पगारे सौ. पुष्पलता पगारे, ज्ञानसिंधु प्रकाशनाचे प्रकाशक, तान्हाजी खोडे, सगर रत्न व दीपोत्सव परिवारातील संपादक मंडळ, कवी सुभाष उमरकर, संजय अहिरे, बाळासाहेब गीरी , सौ. संगीत भामरे, सौ. सुनिता महाजन, सौ सुरेखा आहेर , प्रा. यशवंतराव पाटील यांनी विशेष अभिनंदन केले आहे.



**दि. १४-११-२०२४ रोजी रात्री चारठाणा, परभणी येथे सांवता माळी मंदिरात रंगलेल्या संगीत-काव्य-मैफीलीचे हे मनोहर व अविस्मरणीय दृश्य.....**
**काळजावर कोरले हे**
**मैफीलीचे लेणे मी !**
**भासले आकाश माझे**
**जाहलो रे चांदणे मी !!**

# विक्रमसिंह पाचपुते यांना मतदारांकडून वाढता प्रतिसाद नागवडे जगतापांनी घेतला धसका

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

नगर श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघात भाजपकडून विक्रमसिंह पाचपुते यांची उमेदवारी जाहीर केल्या पासूनच अनुराधा नागवडे व राहुल जगताप यांनी चांगलाच धसका घेतला आहे विक्रमसिंह पाचपुते यांना तालुक्यातील सर्व गटातुन मतदार चांगला प्रतिसाद देत आहेत आमदार बबनरावजी पाचपुते यांनी गेली चाळीस वर्षे विकास कामांबरोबर सतत जनतेच्या सुखा दुःखात आपली नाळ जोडली आहे त्यांनी केलेल्या विविध विकासकामांच्या जोरावर विक्रमसिंह पाचपुते यांचा विजय रथ कोणीही रोखू शकणार नाही पाचपुते हे नेहमी लोकांच्या अडचणी समजून घेत प्रत्येकाला मदतीचा हात पुढे करत आहेत जे बाजार बुनगे निवडणूक आल्यावर संपर्क कार्यालय



उघडतात आणि निवडणूक झाली की पुन्हा मतदार संघात येत सुध्दा नाहीत आता मात्र सर्व पुतणा मावशीचे बेगडी प्रेम मतदारांना दाखवत आहेत मतदार या गोष्टी चांगल्या प्रकारे ओळखुन आहे त्यामुळे विक्रम पाचपुते यांचा विजय निश्चित माणला जात आहे एकंदरीत पाहता सध्या भाजप महायुतीचे पारडे श्रीगोंदा मतदार संघात जड असल्याचे चित्र दिसत आहे.

# विश्वरत्न साहित्य साहित्य सम्राट सत्यशोधक डॉ.अण्णाभाऊ साठे पहिले ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन

## आज कवी संमेलनात जास्तीत जास्त मोठ्या संख्येने हजर व्हावे – आयोजन समितीचे अध्यक्ष तानाजी डाडर,कार्याध्यक्ष सुनील गाडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

सत्यशोधक डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने मिरजगाव शहरात प्रथमच पहिले ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन कर्जत तालुका साहित्य प्रेमी मंडळाच्या वतीने शुक्रवार दिनांक १५.११.२०२४ रोजी केले आहे.हे संमेलन जेष्ठ विचारवंत आणि अण्णा भाऊ साठे यांचे सहकारी रतनलाल सोनग्रा यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होत आहे.उद्घाटक भगवानराव वैराट हे असून स्वागत अध्यक्ष सुरेश 'काका' गोरखे हे आहेत.प्रमुख पाहुणे म्हणून सत्यशोधक बहुजन आघाडीचे सचिन बगाडे,डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्यावर पी.एच.डी.केलेले डॉक्टर प्राध्यापक




अंबादास सकट,अं.नि.स.चे अहिल्यानगर जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. मधुकर आनाप,मुक्ता सावित्री फाउंडेशनचे सुदर्शन चखाले,कुसुमाग्रज साहित्य परिषदेचे अशोक कुमार शर्मा,जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते वाल्मिक तात्या निकाळजे व इतर मान्यवर उपस्थित राहणार असून कविसंमेलनाध्यक्ष प्रसिद्ध कवी नितीन चंदनशिवे हे आहेत.सकाळी ८ वाजता ग्रंथ दिंडी मिरजगाव शहरातून निघणार आहे ११ वाजता दीपप्रज्वलन व कार्यक्रमाचे उद्घाटन होईल.त्यानंतर कुमारी स्नेहल डाडर यांचा मी महात्मा फुले बोलतोय ! हा एक पात्री प्रयोग होईल.त्यानंतर प्रशांत पोतदार यांचे 'मनोरंजनातून विज्ञान' या विषयावर व्याख्यान होईल.नंतर प्राध्यापक लक्ष्मण दिवटे यांचे 'कथाकथन' होईल.प्रसिद्ध कवी नितीन चंदनशिवे हे कवीसंमेलनाध्यक्ष असून त्यांच्या प्रबोधनपर कविता ऐकायला मिळणार आहेत.तसेच जेष्ठ कवी 'प्रबोधनकार' महादेव लांडगे व इतर अनेक मान्यवर कवी संमेलनात सहभागी होणार असून जास्तीत जास्त साहित्य प्रेमी रसिक ग्रामस्थांनी या साहित्य संमेलनात उपस्थित रहावे. असे आवाहन कार्यक्रमाच्या आयोजन समितीचे अध्यक्ष तानाजी डाडर व कार्याध्यक्ष सुनील गाडे यांनी केले आहे.

## दरबार ए शायरी

जपून ठेवशील बघ
प्रतिबिंब माझे
काल राती तुझ्या ते
डोळ्यात राहीलेले !!
मी नवखा जरासा अन
वेंधळाही थोडा
त्यामुळेच तेथे
विसरून राहीलेले !!

डॉ.विजयकुमार कस्तुरे,
ॲडव्होकेट, चिखली.

## चारोळी

मतदान आपुला हक्क आहे
तो कोणीही विसरू नका
जनहिताचा विचार करुनी
मारा सर्वांनी आठवणीने शिक्का.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# राज्य उत्पादन शुल्क विभागाची कार्यवाही;लाखांचा मुद्देमाल जप्त : ४६ आरोपींना घेतले ताब्यात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर । राजकिरण देशमुख**

विधानसभा निवडणूक काळात राज्य उत्पादन शुल्क किनवट/ माहूर विभागाने अवैध दारू अड्ड्यांवर धाडसत्र राबविणे सुरू केले. असून १५ ऑक्टोबर ते आज पर्यंत च्या कालावधीत एकूण ४९ ठिकाणी धाडी टाकून गुन्हे दाखल करण्यात आले आहे,४६ आरोपींना ताब्यात घेत सहा वाहनांसह देशी दारू, हातभट्टी, विदेशी, ताडी, सडवा असा एकूण ७.,७१,००५ / चा रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मतदारसंघांत अवैध दारू विक्रीवर एक्साईजची करडी नजर आहे. ही कारवाई अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क नांदेड गणेश पाटिल यांच्या मार्गदर्शनात निरीक्षक किनवट रत्नमाला गायकवाड. तसेच दुय्यम निरीक्षक रामप्रसाद पवार. बलीराम ईथ्थर. यांच्या नेतृत्वाखाली पार पडली .सदर कारवाईत सहाय्यक दुय्यम निरीक्षक मोहम्मद रफी अब्दुल, जवान एम . यू.अनकाडे, अरविंद जाधव,निशिकांत भोकरे, किरण खंदारे तसेच वाहनचालक दिलिप जाधव यांचा समावेश आहे. आचारसंहिता कालावधीमध्ये अवैध मद्यनिर्मिती, वाहतूक, विक्री व नियंत्रण ठेवण्यासाठी पथके तयार करण्यात आली आहे. कुठेही अवैध दारूविक्री होणार नाही याची दक्षता घेतली जात आहे.



# भारतीय स्वातंत्र्यात लोकशाहीचे नाव,मग निवडणुकीत का निघतो मतदारांचा भाव

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

एखादा तलाठी ग्रामसेवक पोलीस व अन्य शासकीय कर्मचारी अधिकारी यांनी एखाद्या व्यक्तीकडून विविध कामासाठी चार दोन हजार रुपये घेतली तर त्यांच्यावर लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडून कार्यवाही होते,त्यांची शासकीय नोकरी धोक्यात येते,त्यांच्या मागे अनेक वर्ष कायद्याचा ससेमिरा लागतो असे सर्वश्रुत आहे, मग निवडणुकीत आपला लोकप्रतिनिधी मतदारांनी निवडताना मलाच मत द्यावे म्हणून भांडवली उमेदवार मतदारांना खुलेआम कोट्यावधी रुपये वाटतात मग यांच्याविरुद्ध कारवाई का होत नाही, राजातील चार खंडी नेते आपला पक्ष सोडून सत्ताधारी पक्षात गेले त्यांना एकच भीती होती की,मी कमावलेलं भांडवल शासनाच्या ताब्यात जाऊ नये माझ्याभोवती ईडीची चौकशी लागू नये कार्यवाही होऊ नये जेलमध्ये सडत बसण्यापेक्षा पर्याय म्हणून हाच पक्ष बरा म्हणून त्यांनी आपला पक्ष सोडून दुसऱ्या पक्षात गेले, विधानसभा निवडणुका अगदी जवळ आली आहेत,प्रचाराची रणधुमाळी चालू आहे मतदार कोणत्याही पक्षाच्या सभेला जाण्यास तयार नाहीत तेव्हा त्यांना रोजंदारी देऊनच सभा भरवीत आहेत, उद्या मतदान दिवशी देखील मतदान देणार नाहीत म्हणून त्यांना पैसे देण्याचे आमिष दाखवून आपल्या बाजूनेच मतदान होण्यासाठी पैसे वाटले जाणार आहे ही चर्चा मतदारात रंगत आहे, मतदारांना पैसे वाटण्याची प्रथा का व कशामुळे सुरू झाली देशातील बलाढ्य पक्ष हे मतदारासाठी एक सापनाथ तर दुसरा नागनाथ आहे, आमच्यामध्ये तिसरा पक्ष लुडबुड करू नये विद्ववान उमेदवाराची मूळं येथे रुजली तर आम्हाला अवघड बनेल म्हणून पैशाच्या बळावरील निवडणुका लोकशाहीला मारक ठरवीत आहेत.जागतिक स्तरावरील विद्ववान कार्ल मार्क्स यांना शेवटच्या क्षणी मिडियाने प्रश्न केला होता की,उद्याची जगाची सत्ता कशी असेल, तेव्हा कार्ल मार्क्स म्हणतात की उद्याची जगाची सत्ता भांडवलदाराच्या हाती असेल विद्ववानाच्या नाही. हेच वाक्य आज खरे ठरत आहे भारत देश कृषी प्रधान देश असूनही सालनं साल शेतकरी शेतीमालासाठी योग्य भाव मिळावा म्हणून सरकारकडे टाहो फोडतात पण त्यांच्या शेतीमालाचा भाव निघत नाही पण पाच वर्षाला निवडणुकीत जिंकण्यासाठी मतदारांचा भाव निघतो जसे आठवडी बाजारात बैल गाय म्हैस बकरी अशा जनावराचा भाव निघते तसा पाच वर्षाला माणसाचा भाव काढण्याचा धंदा बडे उमेदवार करतात, देश स्वतंत्र्यासाठी हजारो क्रांतिकारक आपले बलिदान देऊन हा देश इंग्रजांच्या राजवटीतून मुक्त केला तर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी जगात सर्वात मोठी असलेली लोकशाही भारतीय लोकांना बहाल केली, त्यांचा त्याग बडे नेते पायदळी तुडविले आहेत आणि एक वर्षानुवर्षे सत्तेत राहिलेले बडे नेते आपण प्रत्येक वेळी निवडणूक जिंकण्यासाठी आपली साधने तयार केले व्यवस्था करून ठेवली आहे आणि जाहीर सभेत मात्र विकासाचा डांगोरा पिटविणारे नेत्यांना देश स्वतंत्र्यापासूनच मतदार हे ऐकत आले आहेत पण विकासाची व्याख्याच मतदारांना अजून तरी कळले नाही, भारतीय राज्यघटना देशातील सर्व जाती धर्मासाठी सर्वश्रुत असताना एक तुपाशी एक उपाशी तर एक आकाशात एक जमिनीवर असे लोकशाहीमध्ये चित्र का उभी राहिले देशातील अनेक जाती पैकी शेवटच्या घटकापर्यंत शासकीय योजना मिळतील तेव्हाच त्यांना खऱ्या अर्थाची लोकशाही मिळाली असे म्हणता येईल मतदारांना मत मागणे हे उमेदवाराचे कर्तव्य आणि आपले मत अधिकार देणे हे मतदारांचे कर्तव्य आहे पण मतदारांच्या अधिकारावर त्यांच्या स्वतंत्र्यावर गदा आणणे त्यांना मोकळा श्वास न घेऊ देणे असे होत असेल तर लोकशाही फक्त इथे नाव आहे असेच समजावे लागेल,आपला खरा आणि योग्य उमेदवार कोण आहे हे निवडणे मतदारांना देखील अवघड होईल जसे की गाढवाच्या लाथाळीत अनेक जण बाजूला होऊन थांबतात कारण आपणासही लाथ बसेल म्हणून पण एक दोन धिट असलेले पुढे येतात तसे या राजकीय लाथाळीत चार दोन अपक्ष उमेदवार निवडणूक रिंगणात येतात आणि ही कायमची राजकीय लाथाळी थांबवावी हा त्यांचा अजेंडा असतो,तेव्हा हा उमेदवार इथे रुजू नये म्हणून लाखो रुपयाची उधळण करीत बड्या उमेदवाराकडून मतदारांचा बाजार भाव सारखा भाव निघतो आणि विकास मात्र तसाच वर्षानुवर्षी वस पडलेला दिसतो हेच चित्र सर्वत्र दिसून येते आहे.

**–माधव बैलकवाड नायगाव**
**वार्तापत्र मो.८०८०४७१६४२**

# कानडा राजा पंढरीचा !

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

महाराष्ट्रात धर्माला फार महत्त्व दिले जाते. धर्मतेज जागवणारा पंढरीचा विठोबा हा महाराष्ट्र, आंध्र आणि कर्नाटक राज्यांच्या सीमेवर आहे. काही जण म्हणतात, 'हा धनगरांचा देव आहे. हा मूळ 'आदिम' (आदिवासी), अ-नागर देवच पुढे धनगरांसह 'पंडरिगे' या गावी आला आणि पुढे तो 'पांडुरंग' झाला.' पंडरिगे या गावाची 'पंढरी' झाली. पूर्वी तेथे धनगरांच्या वस्त्या होत्या; परंतु नंतर नागरवस्तीमुळे पुढे या पंढरीला 'पंढरपूर' या नावाने संबोधण्यात येऊ लागले. अशा रितीने पंढरीचे पंढरपूर झाले.

पुंडलिकाच्या वेळी पंढरपूरला स्थापन झालेली पांडुरंगाची ही मूर्ती पुढे कर्नाटकातील विजयनगरच्या राजाने त्याच्या साम्राज्यात नेली. त्याने त्या मूर्तीची तुंगभद्रेच्या तिरावर स्थापना केली. त्या काळी महाराष्ट्रातील पैठण येथील संत भानुदास (संत एकनाथ महाराज यांचे आजोबा) हे विठ्ठलाचे मोठे भक्त होते. त्यांचा आध्यात्मिक अधिकार मोठा होता. एकदा विठ्ठलाने प्रसन्न होऊन त्यांना दृष्टांत दिला आणि 'मी कर्नाटकात आहे. तू मला पंढरपुरात नेऊन माझी स्थापना कर', असे त्यांना सांगितले. विठ्ठलाने सांगितल्याप्रमाणे संत भानुदास यांनी विजयनगरच्या राजाकडे जाऊन विठ्ठलाच्या मूर्तीची मागणी केली. राजालाही दृष्टांत झाला होता. त्यामुळे संत भानुदासांचे विठ्ठल प्रेम आणि भक्ती पाहून राजाने ती मूर्ती त्यांना दिली. संत भानुदासांनी ती मूर्ती पंढरपूरला आणून तिची प्रतिष्ठापना केली.

पांडुरंग हा शैव आणि वैष्णव दोघांचाही देव आहे. याला शैव आणि वैष्णव दोघेही भजतात. शैव पंथीय पांडुरंगाला 'वीरभद्र' म्हणजेच 'विठ्ठल' म्हणतात, तर वैष्णव त्याला 'गोपाळकृष्ण' असे म्हणतात. तो विष्णु आणि शिव यांचा अवतार आहे; म्हणूनच तो 'हरिहर' आहे. असा हा पांडुरंग श्रीकृष्णाचाच अवतार आहे. काही जण 'विठ्ठल हा भगवंताचा नववा अवतार बुद्ध आहे', असेही म्हणतात. (आद्यशंकराचार्यांच्या काळात भारतात काही नवीन धार्मिक प्रवृत्तींचा उदय होऊन जैन, बौद्ध इत्यादी धर्मपंथ उदयास आले होते. महाराष्ट्रातही बौद्ध धर्माचा प्रभाव असल्याचे दिसून येते; कारण कोकण किनारपट्टी, घाटमाथा, मराठवाडा येथील सह्याद्री पर्वताच्या रांगांमध्ये बुद्धाच्या कलाकृती असलेल्या गुंफा दिसतात.) जैन विठ्ठलाला 'तो बाविसावा तीर्थंकर नेमीनाथ आहे', असे मानतात. नेमीनाथ आणि कृष्ण हे दोघेही गोपाळच होते. ते यदुकुलोत्पन्नच होते. नेमीनाथ हाही विठ्ठलासारखा वर्णाने सावळा होता. नेमीनाथांचे शंख हे चिन्ह विठ्ठलानेही धारण केले आहे. त्यामुळे या सर्व लक्षणांवरून 'विठ्ठल हा दिगंबर नेमीनाथ असावा', असे जैनांचे मत आहे.

दक्षिणेला हाच गोपाल 'श्रीव्यंकटेश ऊर्फ तिरुपती बालाजी' म्हणून प्रसिद्ध आहे; कारण व्यंकटेशाची पत्नी पद्मावती आहे, तर विठ्ठलाच्या पत्नीचेही नाव पद्मावती (पदुबाई) आहे. व्यंकटेशाची पत्नी पद्मावती त्याच्यावर रूसून तिरूयानूर येथे चिंचेच्या वनात रहायला गेली, तर विठ्ठलाची पत्नी रुक्मिणी ही दिंडीर वनात (चिंचेच्या वनात) जाऊन बसली होती. 'विठ्ठलाला 'पांडुरंग' म्हणतात', तसेच व्यंकटेशालाही कर्नाटकातील पर्वताच्या स्थलनामावरून 'वेंगडम' असे म्हणतात. त्यामुळेच त्याला 'विठ्ठलेश्वर अथवा व्यंकटेश' असेही म्हणतात. कुरूबा ('कुरूबा' समाज हा धनगर पोटजातीपैकी एक आहे.) आणि धनगर यांचा देव एकरूप होऊन त्यातून 'विठोबा' निर्माण झाला. शिला प्रतिमेतून ही जी सांगोपांग मूर्ती घडली, ती मात्र या दोन्ही जमातींनी शतकानुशतके त्याच रूपात जपून ठेवली असली पाहिजे; म्हणूनच विठ्ठल आणि तिरुपति या दोन्ही मूर्तींत पुष्कळ साम्य आढळते. पंढरीचा विठोबा दोन्ही हात कटीवर ठेवून उभा आहे, तर कर्नाटकात तो एक हात कटीवर आणि दुसरा हात वरद मुद्रेत असलेला अशा स्वरूपात अनेक ठिकाणी पहायला मिळतो. त्यामुळेच संतांनी 'सावळा हो विठ्ठलु कर्नाटकु', असे त्याचे वर्णन केले आहे. संतांनी त्याला 'कानडा' म्हणूनही हाक मारली आहे. चैतन्याची ज्या अनुसंधानातून आराधना केली जाते, त्या स्वरूपात ते प्रगट होते. ज्याचा जसा भक्तीभाव असेल, तशी त्याला देव अनुभूती देतो. बंगालमधील कोलकाता येथील कोळयांच्या राणीने दक्षिणेश्वरीदेवीची स्थापना केली होती. त्या देवळात तिने श्रीरामकृष्ण परमहंस यांची पुजारी म्हणून नियुक्ती केली होती. श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या भक्ती-भावामुळे देवी त्यांच्यावर प्रसन्न झाली आणि तिने त्यांना दर्शन दिले. अनेकांना वाटते, 'दगडात देव असतो का ?'; परंतु 'भक्ती-भावाने दगडालाही पाझर फुटतो', हे ध्यानात घ्यायला हवे.

पांडुरंग हे सामान्यांचे दैवत आहे. पांडुरंगाचा रंग सावळा आहे आणि कृष्णही सावळाच आहे. काळा रंग हा अद्वैताचा आहे. वृंदावनातील गोपी कृष्णाला म्हणत, "अरे कृष्णा, तू अमावास्येला अंगावर काळी घोंगडी घेऊन यमुनाकाठी कदंब वृक्षावर बसलास की, तू आम्हाला दिसतच नाहीस; कारण रात्र काळी, यमुना काळी, तू काळा आणि घोंगडीही काळीच ! अशा वेळी हे सर्व अद्वैत होऊन जाते." संत ज्ञानदेव म्हणतात, 'तुज सगुण म्हणों कीं निर्गुण रे । सगुण निर्गुण एकु गोविंदु रे ।' म्हणजेच तो सगुण आहे आणि निर्गुणही आहे. त्याचे सगुण स्वरूप हे निर्गुणच आहे. तो स्वच्छ म्हणजे निर्मळ आहे. त्याची इंद्रिये विकाररहित आणि स्वच्छ आहेत. तो आत-बाहेर स्वच्छ आहे; म्हणून तो 'पांडुरंग' आहे. एकदा लहानपणी संत ज्ञानेश्वर आणि मुक्ताबाई खेळत असतांना मुक्ताबाई ज्ञानदेवांना म्हणाली, "अरे दादा, तू या पांडुरंगाला निर्गुण म्हणतोस; परंतु हा तर सगुण स्वरूपात येथे कटीवर हात ठेवून उभा आहे." त्यावर संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, "मुक्ता, मी तुला गुरुमुखातून सांगतो. अगं, हा निर्गुणी बुंद (बिंदु) सगुणी उतरला आहे." एकूणच हा निर्गुणच सगुण स्वरूपात इथे दिसत आहे. तो कष्टकरी, शेतकरी, सामान्यजन आणि अनाथ यांचा कैवारी आहे; म्हणून तो (उन्हात कष्ट करून रापलेला असा) काळ्या रंगाचा झाला आहे. असा हा सगुण-निर्गुण रूपी पांडुरंग आहे.

कोणत्या तरी विशिष्ट वारीला, तिथीला अथवा कोणत्या तरी मासात विशिष्ट देवतांची स्पंदने पृथ्वीवर अधिक प्रमाणात कार्यरत असतात. तो काळ त्या देवतेचा काळ मानला जातो, उदा. शिवाचा सोमवार, दत्ताचा गुरुवार, तशी श्रीविष्णूची एकादशी. वर्षभरात २४ वेळा येणार्या एकादशींच्या तुलनेत आषाढ आणि कार्तिक मासांतील शुक्लपक्षात येणार्या एकादशींच्या वेळी श्रीविष्णूचे तत्त्व पृथ्वीवर अधिक प्रमाणात येत असल्याने श्रीविष्णूशी संबंधित या दोन एकादशींचे महत्त्व अधिक आहे. (संदर्भ : सनातन डॉट ऑर्ग)

**–जगन घाणेकर,**
**घाटकोपर, मुंबई**

# खाद्य पदार्थ विकताना ग्राहकांच्या भावनाही जपायला हव्यात

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

कल्याण येथील 'गुड फ्लिपिन बर्गर्स' या बर्गर्स विकणाऱ्या दुकानातील एक व्हिडीओ सध्या सामाजिक माध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. तेथील एका बर्गर प्रकारामध्ये म्हशीच्या मांसाचा वापर करण्यात येत होता आणि त्याबाबत ग्राहकांना कोणतीच सूचना दिली जात नव्हती तसेच दुकानात किंवा मेन्यू कार्डात तसे स्पष्ट नमूदही केले गेले नसल्याचे एका हिंदु ग्राहकाने तेथील ग्राहकांच्या लक्षात आणून दिले आहे. 'हिंदू म्हशीचे मांस खात नाहीत. त्यामुळे 'बर्गर'मध्ये म्हशीचे मांस वापरायचे असेल, तर त्याविषयी ग्राहकांना माहिती द्यायला हवी', असे या हिंदु ग्राहकाने दुकानातील कर्मचार्यांना सुनावल्याचे या व्हायरल झालेल्या व्हिडिओत दिसत आहे. कल्याण वायलेनगर येथील 'गुड फ्लिपिन बर्गर्स' या दुकानात एक हिंदु ग्राहक पत्नीसमवेत गेला असतांना त्याने 'बर्गर' मागितला. बर्गरमधील मांसाविषयी शंका आल्यावर त्याने दुकानातील कर्मचार्यांना 'बर्गर'मध्ये कोणत्या प्राण्याचे मांस आहे ?', अशी विचारणा केली. त्यावर कर्मचार्याने बर्गरमध्ये म्हशीचे मांस असल्याचे सांगितले. त्यावर त्या हिंदु ग्राहकाने बर्गरची केलेली मागणी रद्द केली. त्यावेळी दुकानामध्ये अन्यही काही ग्राहक 'बर्गर' खात होते; मात्र 'बर्गर'मध्ये म्हशीचे मांस असल्याचे कळताच तेथे बसलेले सर्व ग्राहक उठून गेल्याचे व्हिडिओत दिसत आहे. काही हिंदु ग्राहकांनी त्यांनी दिलेली 'बर्गर'ची मागणी रद्द करून पैसे परत घेतले.

मांस असलेले बर्गर खाण्यात हल्लीच्या तरुणाईला अधिक रुची असल्याने मांस असलेले बर्गर जवळपास सर्वच बर्गर्सच्या दुकानात उपलब्ध असतात; मात्र अशा बर्गर्समध्ये साधारणतः कोंबडीचे मांस वापरले जात असल्याचा समज असल्याने आपण घेत असलेल्या बर्गरमध्ये कोणाचे मांस वापरले आहे याबाबत कोणताही ग्राहक दुकानदाराकडे कधी चौकशी करत नाही. 'गुड फ्लिपिन बर्गर्स'ची मुंबई आणि परिसरात एकूण २४ दुकाने आहेत.देहली, पुणे, बेंगळुरू या ठिकाणीही त्यांची दुकाने आहेत. 'गुड फ्लिपिन बर्गर्स'मध्ये सुद्धा कोंबडीचेच मांस असते असे गृहीत धरून आजतागायत ग्राहक या ठिकाणचे बर्गर्स चवीने खात होते; मात्र जेव्हा सत्य लक्षात आले तेव्हा अनेकांची तळपायाची आग मस्तकात गेली आहे. 'गुड फ्लिपिन बर्गर्स'ची बहुतांश दुकाने ही हिंदुबहुल भागात वसलेली आहेत. हिंदू म्हशीचे मांस खात नाहीत मग म्हशीचे मांस असलेले बर्गर्स नक्की कोणाच्या जिभेचे चोचले पुरवण्याकरिता वापरले जाते असाही प्रश्न यानिमित्ताने विचारला जात आहे. हिंदू ग्राहकाने मीट बर्गरची मागणी केली असता ग्राहक हिंदू आहे हे लक्षात आल्यावर त्याला दिल्या जाणाऱ्या बर्गरमध्ये म्हशीच्या मासाचा वापर केला जात असल्याचे ग्राहकाला सांगण्यातही येत नव्हते किंवा मेन्यू कार्डात तसे स्पष्ट नमूदही करण्यात आले नव्हते. आजतागायत कितीतरी हिंदू ग्राहकांनी या ठिकाणचे म्हशीचे मांस घातलेले बर्गर्स खाल्ले असतील. हिंदू ग्राहकांना कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांना अंधारात ठेवून म्हशीचे मांस असलेले बर्गर्स खायला देणे ही केवळ फसवणूक नसून त्यांच्या धार्मिक भावनांचाही अनादर आहे. आजमितीला मॅकडोनाल्ड, केएफसी, बर्गर किंग अशा कितीतरी खाद्य कंपन्या आपल्या आउटलेट्समधून मांसाहारी बर्गर्सची विक्री करतात. मांसाहारी बर्गरमध्ये कोंबडीचे मांस आहे असे समजून ग्राहक डोळे बंद करून या ठिकाणचे मांसाहारी बर्गर चवीने खातात; मात्र 'गुड फ्लिपिन बर्गर्स'मध्ये घडलेल्या घटनेवरून ग्राहकांनी जागृत व्हायला हवे. आपण खरेदी करत असलेल्या मांसाहारी बर्गरमध्ये कोणाचे मांस वापरले आहे हे ठणकावून विचारले पाहिजे. गाय किंवा म्हशीचे मांस असलेले खाद्यपदार्थ त्याठिकाणी विकले जात नाहीत ना याबाबत खात्री करून घ्यायला हवी. हिंदुबहुल भागात असलेल्या अशा दुकानांमध्ये गाय किंवा म्हशीच्या मांसाचे कोणतेही पदार्थ आमच्याकडे विकले जात नाहीत अशा प्रकारचा फलक दर्शनी भागात लावण्यास प्रवृत्त करायला हवे, त्याशिवाय या कंपन्या वठणीवर येणार नाहीत. भारतात बहुसंख्य हिंदू राहतात आणि हिंदूंना गाय पूजनीय असल्याने आम्ही भारतात बीफ बर्गर विकत नसल्याचे मॅकडॉनल्ड्स कंपनीने यापूर्वीच स्पष्ट केले आहे, मग 'गुड फ्लिपिन बर्गर्स'ने यातून अद्याप बोध का घेतलेला नाही. खाद्य पदार्थ विकणाऱ्या कंपन्या, हॉटेल्स आणि रेस्टोरंट आपला खप वाढवण्यासाठी पदार्थ खमंग आणि स्वादिष्ट बनवण्याकरिता अधिक भर देतात; मात्र हे पदार्थ ग्राहकांच्या धार्मिक भावना आणि आरोग्य जपणारे असायला हवेत याकडे ही मंडळी केव्हा लक्ष देणार ?

**–जगन घाणेकर,**
**घाटकोपर, मुंबई**

# पुन्यनगरीचे पत्रकार नरेंद्र येरावार व मुलगा प्रसाद येरावार यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**उमरी (प्रतिनिधी)**

उमरी शहरात नेहमीच धार्मिक कार्यक्रम मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. दिं.११ नोव्हेंबर रोजी मामिडवार नगर येथे श्रीराम कथेचे आयोजन करण्यात आले. दिनांक ११नोव्हेंबर रोजी दुपारी चार वाजता च्या सुमारास विठ्ठल किशनआप्पा मुक्कावार हे कथा ऐकण्यासाठी कथेच्या ठिकाणी गेले असता फिर्यादीच्या जवळ पुण्यनगरीचे पत्रकार नरेंद्र जगन्नाथ येरावार व त्याचा मुलगा प्रसाद नरेंद्र येरावार जाऊन तू राम कथा कसे काय ऐकण्यासाठी आला आहेस, तुला कोण बोलावले आहे असे म्हणून आरोपी प्रसाद नरेंद्र येरावार यांनी फिर्यादीला ढकलून देऊन थापड बुक्क्यांनी मारहाण करून डावा हात पिरगाळून दुखापत केली तर पत्रकार नरेंद्र येरावार यांनी शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. तक्रारीवरून उमरी पोलीस स्टेशन येथे एनसीआर ०३९८/२०२४ दिं.११/११/२०२४ नुसार कलम ११५(२), ३५२,३५१(२),३५१(३),३(५) आदि कलमान्वये आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

# बालपण हरवलेला 'बालदिन'

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

'लहानपण देगा देवा । मुंगी साखरेचा रवा ।।
ऐरावत रत्न थोर । त्यासी अंकुशाचा मार ।।
ज्याचे अंगी मोठेपण । तया यातना कठीण ।।'

या एका अभंगात संत तुकाराम महाराजांनी लहानपणाची थोरवी वर्णिली आहे. अंगात मोठेपण आले कि त्याला अनेक समस्यांना सामोरे जावे यासाठी कोणतेही दायित्व नसलेले लहानपणच बरे हे त्याकाळी तुकाराम महाराजांनी सांगितले असले, तरी आजमितीला लहानपणच अधिक यातनादायी झाले आहे. देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मदिनाप्रीत्यर्थ साजरा होणारा बालदिन दरवर्षी शाळांमध्ये उत्साहाने साजरा होतो. बालकांच्या हक्काचा वर्षातील हा एकमेव दिवस असला,तरी आजच्या लहान मुलांची स्थिती पाहिल्यास त्यांचे बालपण कुठेतरी हरवत चालल्याचे लक्षात येते. विज्ञानाने जग प्रगतशील झाले असे म्हणतात; मात्र याच विज्ञानाने लाभलेल्या मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ गेम, केबल टीव्ही यांसारख्या साधनांनी मुलांना वेगळ्याच जगात नेले. मित्र मैत्रिणींसोबत मैदानी खेळ खेळण्याच्या, पालकांशी गप्पा मारून आपले विचार प्रकट करण्याच्या वयात मुले मोबाईलच्या आभासी जगामध्ये रमताना दिसत आहेत. ज्यामुळे हल्ली बालवयातच मुलांना नेत्रविकार, मनोविकार जडू लागले आहेत. देशासाठी प्राणाचे बलिदान करणारे क्रांतिकारक, समाजसुधारक, राष्ट्रपुरुष हे आजच्या मुलांचे आदर्श नसून कार्टून जगतातील खोटी पात्रे मुलांना आपले आदर्श वाटू लागले आहेत. मुलांचे भवितव्य घडवण्याच्या हेतूने नोकरी व्यवसायासाठी घराबाहेर पडणारे आई बाबा मुलांना



उमलत्या वयातच वेळ देत नसल्याने मुलांमधील त्यांच्याविषयीची प्रेम आणि आपुलकी कुठेतरी उणावू लागली आहे. त्यामुळे हल्लीची मुले पालकांना किंवा मोठ्यांना उलट उत्तरे देताना जराही विचार करत नाहीत. सातत्याने हिंस्त्र व्हिडीओ गेम्स, रिल्स पाहून लहान मुलांमध्येही मनोविकार, दोष वाढू लागले आहेत. सध्याच्या स्पर्धात्मक जगात आपल्या पाल्याचा निभाव लागावा म्हणून पालक त्यांना शाळेसोबत कोचिंग क्लासेस, प्रायव्हेट ट्युशन्सना घालत आहेत. हे कमी म्हणून कि काय त्याच्या जोडीला जिम्नॅस्टिक, स्पोर्ट्स, सिंगिंग, डान्स क्लासेसनाही मुलांना जावे लागत आहे. या सर्वांच्या ओझ्याखाली बालवयातच मुले राब-राब राबत आहेत. पालकांच्या अपेक्षांचे ओझे पेलताना मुलांचे बालपण मात्र हरवत चालले आहे. गेल्या काही वर्षांत लहान मुलांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्येही कमालीची वाढ झाली आहे . या सर्वांचा परिणाम म्हणून बाल गुन्हेगारीचा आलेखही दिवसागणिक चढू लागला आहे. १०-१२ वर्षांची लहान मुले सुद्धा काही मनाविरुद्ध घडले, घरात कोणी उलट बोलले, अपमान केला किंवा परीक्षेत कमी गुण मिळाले म्हणून आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेऊ लागले आहेत. बालमजूर प्रतिबंधक कायदा अस्तित्वात असला तरी आज कितीतरी किराणा मालाच्या दुकानांत, चहाच्या टपरीवर, उपहारगृहांमध्ये, छोट्या कारखान्यांमध्ये लहान मुले राबताना दिसतात. सिग्नलवर, रेल्वे आणि बसेसमध्ये लहान मुलांकडून भीक मागून घेणे हाही एक व्यवसाय झाला आहे. मुलांचे हरवत चाललेले बालपण त्यांना पुन्हा मिळवून देण्याचे दायित्व नक्की कोणाचे ? पालकांचे, समाजाचे कि सरकारचे ?

**–जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

## जयभवानीच्या गळीत हंगामाचा भव्य शुभारंभ

# ह.भ.प.महंत शिवाजी महाराज,माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांची प्रमुख उपस्थिती





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत**

शिवाजीनगर गढी येथील जयभवानी सहकारी साखर कारखान्याच्या ४२ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ श्री क्षेत्र नारायणगड संस्थानचे मठाधिपती ह. भ. प. महंत शिवाजी महाराज यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव (दादा) पंडित, माजी चेअरमन जयसिंग पंडित, व्हा. चेअरमन भाऊसाहेब नाटकर यांच्यासह कारखान्याचे संचालक, सभासद, विविध संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

प्रारंभी ह.भ.प. शिवाजी महाराज आणि कारखान्याचे कर्मचारी राजेंद्र नवले व शंकर ढाकणे यांच्या शुभहस्ते विधीवत पूजा करुन गव्हाणीत मोळी टाकून गळीत हंगामाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी बोलताना कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव (दादा) पंडित, म्हणाले की, साखरे बरोबरच उपपदार्थांचे उत्पादन होणार असल्यामुळे जयभवानी ऊसाला चांगला भाव देण्यास सज्ज आहे. बायप्रॉडक्टवर लक्ष केंद्रित करत १. १० लक्ष बल्क लिटर क्षमतेचा डीस्टलरी प्रकल्प पुढील हंगामात कार्यान्वित करण्यात येणार आहे, त्यामुळे निधी उपलब्ध होईल आणि शेतकऱ्यांच्या ऊसाला जादा दर देताना अडचण येणार नाही. आपण राजकारणात शब्द पाळतो, आणि शब्द आपण खरा करुन दाखवला आहे. जयभवानी आपला हक्काचा कारखाना आहे, जयभवानीने शेतकऱ्यांना नेहमीच न्याय दिलेला आहे. ऊस उत्पादक शेतकरी, ऊसतोड कामगार, कर्मचारी आणि प्रशासन यांनी हातात हात घालून जय भवानीचा चालू हंगाम यशस्वी करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना जनरल मॅनेजर दत्तात्रय टेकाळे म्हणाले की, या हंगामात पाच लाख मेट्रीक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवुन आम्ही काम करत आहोत. या हंगामात डिस्टिलरी, साखर कारखान्याचे मेंटेनन्सचे कामे पूर्ण झाले असून कारखाना सुरू झाल्यानंतर डिस्टीलरीचे उत्पादन ८ ते १० दिवसात सुरू होणार आहे. डिस्टीलरीकडील स्पिरीटचे उत्पादन प्रतीदिवस ४५ ते ४८ हजार बल्क लीटर होणार आहे. तसेच ७० ते ८० लाख बल्क लीटर स्पिरीट उत्पादनाचे उदिष्ट आहे. येणार्या या गळीत हंगामात उदीष्टापेक्षा जास्त गाळप करण्याचा मानस आहे. कारखाना शासनाने ठरविलेल्या तारखेला सुरू करणार आहोत. बायोगॅस सीएनजी, पोटॅश खत, इथेनॉल या सारखे बायप्रॉडक्टचे उत्पादन घेतल्यास आपल्याला स्पर्धेत टिकता येईल. लवकरच कारखान्याची गाळप क्षमता वाढविण्याच्या व्यवस्थापणाच्या विचाराधीन आहे असेही ते म्हणाले. महंत ह.भ.प. शिवाजी महाराज यांचे यावेळी आशिर्वादपर भाषण झाले.

यावेळी कारखाना साईटवर पोहचलेल्या पहिल्या वाहन मालकाचा रोख रक्कम देवुन गौरव करण्यात आला. ट्रॅक्टरचे मालक गव्हाणे दत्तात्रय दगडू यांना ह.भ.प महंत शिवाजी महाराज यांच्या हस्ते रोख स्वरूपात पारितोषिक देण्यात आले. सूत्रसंचालन माधव चाटे यांनी केले. याप्रसंगी कृषि उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती विकास सानप, ड परसूराम येवले, बिपिन डरपे, यांच्यासह संचालक सर्वश्री, जगन्नाथ शिंदे, संभाजीराव पवळ डॉ. आसाराम मराठे, संदीपान दातखीळ, जगन्नाथ दिवाण, कुमारराव ढाकणे, गणपत नाटकर, जगन्नाथ काळे, बाबुराव काकडे, साहेबराव चव्हाण यांच्यासह, सुभाषराव मस्के, शांतीलाल पिसाळ, अशोक नाईकवाडे, विष्णुपंत घोंगडे सरपंच गढी, श्रीहरी पवार, यांच्यासह कार्यकारी संचालक राजेंद्र खाडप, शेतकी अधिकारी जगन्नाथ शिंदे, चीफ इंजीनियर अशोक होके, ऋषिकेश देशमुख, प्रॉडक्शन मॅनेजर गजानन वाळके, मुख्य लेखापाल सौरभ कुलकर्णी, परचेस ऑफिसर सोळुंके, संगणक प्रमुख धनाजी भोसले, डिस्टीलरी इन्चार्ज राजेंद्र बडे, सिव्हिल इंजिनियर भालचंद्र कुलकर्णी, सुरक्षा अधिकारी नारायण औटे, सचिन उधे, वचिष्ठ कुटे, सुदाम पघळ, ज्ञानेश्वर जामकर तसेच सर्व खाते प्रमुख, पदाधिकारी, ऊस बागायतदार, ऊस तोडणी ठेकेदार, कर्मचारी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# यंदा नेवासामध्ये परिवर्तन घडवणार: मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा विरोधकांवर हल्लाबोल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नेवासा । प्रतिनिधी**

सहकाराचा जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अहिल्यानगर जिल्ह्यात, सहकार क्षेत्रावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवण्याचे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. नेवासा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार विठ्ठल लंघे यांच्या प्रचारासाठी नेवासा येथे आलेल्या शिंदेंनी विरोधकांवर हल्लाबोल करत जनतेला महायुतीला साथ देण्याचे आवाहन केले.

मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात घराणेशाहीला विरोध दर्शवून, परिवर्तनाची संधी मिळाल्याचे सांगितले. या मतदारसंघातील दादागिरी, दडपशाही आणि भ्रष्टाचार मोडून काढण्याचा निर्धार महायुतीने केला आहे, असे शिंदे म्हणाले. विशेषतः शनी शिंगणापूर मंदिरातील कथित भ्रष्टाचारावर टीका करत, शनी देवाचा कोपच यंदा नेवासामध्ये परिवर्तन घडवणार आहे, असे ते म्हणाले.शिंदेंनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत ९७,७६८ बहिणींच्या खात्यात निधी जमा झाल्याचे नमूद केले. आम्ही घेणारे नव्हे तर देणारे आहोत. माझ्या लाडक्या बहिणी आता



महालक्ष्मी नव्हे तर कडकलक्ष्मी बनून विरोधकांना त्यांच्या जागी दाखवतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

महायुतीच्या नेतृत्वाखाली नेवासामध्ये परिवर्तन होईल, अशी अपेक्षा शिंदेंनी व्यक्त केली, ज्यामुळे आगामी निवडणुकीत हा मतदारसंघ महत्त्वाचा ठरण्याची शक्यता आहे.

## साकुरमध्ये बंदूकीचा धाक दाखवून सोन्याचे दुकान लुटले

# हवेत गोळीबार करत धुमस्टाईलने फरार पारनेरच्या दिशेने पोलीसांकडून पाठलाग

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**संगमनेर । प्रतिनिधी**

साकुर – संगमनेर तालुक्यातील संगमनेर नंतर सर्वात मोठी बाजारपेठ असणार्या साकूर येथे आज सोमवारी भर दुपारी दिड वाजता दरोडेखोरांचा थरार समोर आला. दुचाकीवरून आलेल्या पाच दरोडेखोरांनी बंदूकीचा धाक दाखवत बसस्थानकाजवळील कान्हा ज्वेलर्स दूकान लूटून नेले. या लुटीनंतर सदर चोरट्यांनी भर गर्दीमध्ये हवेत गोळीबार करत घटनास्थळावून धुमस्टाईलने पळ काढला. ही घटना समजल्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे, घारगाव पोलिस निरीक्षक दिगंबर भदाणे यांच्या पथकाने पारनेरच्या दिशेने पळालेल्या चोरट्यांचा पाठलाग सुरू केला आहे. दरम्यान या रस्त्यातील मांडवे फाटा, खडकवाडी याठिकाणी नागरीकांनी या चोरट्यांना पकडण्याचा प्रयत्न केला असता. चोरट्यांनी हवेत गोळीबार करत धुम ठोकली. भरदिवसा गजबजलेल्या ठिकाणी ही घटना घडल्याने साकूरमध्ये एकच खळबळ उडाली असून पोलीसांच्या कायदा सुव्यवस्थेवर प्रश्न चिन्ह निर्माण झाला आहे.




सविस्तर माहिती अशी की, साकूर बसस्थानकजवळ निखील सुभाष लोळगे यांचं कान्हा ज्वेलर्सचे दूकान आहे. दुपारी दिड वाजेच्या सुमारास पल्सर गाडीवर पाच दरोडेखोरांनी येऊन दुकानात प्रवेश केला. निखिल लोळगे व तेथे असलेल्या एका ग्राहकाला बंदूकीचा धाक दाखवत बाजूला केले. त्यांनी कान्हा ज्वेलर्स दुकानातील संपूर्ण सोन्याचा माल बॅगेत भरून लूटून नेला. पाचही दरोडेखोरांनी तोंडाला कापड बांधलेले होते. दरोडेखोरांनी गंठण, चैनी, मंगळसूत्र, वाट्या, कान चैनी, मिनी गंठण, टॉप्स, बाळ्या आदि सोन्याचं माल घेऊन फरार झाले. या घटनेनंतर नागरिकांनी मोठ्या प्रमाणात घटनास्थळी गर्दी केली मात्र या दरोड्याखोरांकडे बंदूक असल्याने त्यांनी बंदूकीचा धाक दाखवून नागरीकांना धमकावत तेथून पारनेरच्या दिशेने धुम ठोकली.दरम्यान घारगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत दरोडेखोरांच्या मुसक्या आवळण्यासाठी पथक रवाना केले असून उपविभागातील पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे यांनी देखील दोन टिम या मार्गावर रवाना केले आहे. सदर चोरटे पारनेरच्या दिशेने गेल्याने पारनेर पोलीस देखील त्यांच्या मागावर आहे. दरम्यान दरोडेखोरांकडे बंदूक असल्याने त्यांची गाडी अडवण्याचा कोणी प्रयत्न करत असेल तर त्यांना बंदूकीचा धाक दाखवून प्रसंगी हवेत गोळीबार करत ते प्रसार होत आहे. त्याचा हा संपूर्ण प्रताप सीसीटीव्ही कॅमेर्यात कैद झाला असून लवकरच या दरोडेखोरांच्या मुसक्या आवळल्या जातील असे पोलीस उपाअधिक्षक कुणाल सोनवणे यांनी म्हंटले आहे.

# सिंदफणा शाळेचा वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात साजरा

## खेळातून संस्कार आणि विकास होतो: प्राचार्य सागर राऊत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माजलगाव । प्रतिनिधी**

विद्या भुवन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंदफणा पब्लिक स्कूलमध्ये शाळेचा सचिव मंगलताई सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी (दि. ८ नोव्हेंबर) इयत्ता पहिली दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. गुरुकुल इंग्लिश स्कूल, बीड चे आयोजन श्री. शितल सर्वज्ञ आणि एम.आय.टी. स्कूल, अंबाजोगाई चे प्राचार्य श्री. सागर राऊत यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

क्रीडा महोत्सवाची सुरुवात भव्य ध्वजारोहणाने करण्यात आली. यानंतर इयत्ता चौथीतील विद्यार्थिनी फैझाह शेख हिने सर्व खेळाडूंच्या वतीने क्रीडा शपथ दिली. या प्रसंगी क्रीडा शिक्षक श्री. पुरुषोत्तम सर यांनी मनोगत व्यक्त करताना खेळांचे महत्त्व विशद केले. प्रमुख पाहुणे एम.आय.टी. स्कूल,



अंबाजोगाई चे प्राचार्य श्री. सागर राऊत यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रातील संधी आणि महत्त्व पटवून देताना खेळातून संस्कार, निर्णय क्षमता, सहानुभूती, शिस्त आणि सहकार्याची भावना खेळातूनच निर्माण होते. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. या गुणांच्या बळावर व्यक्ती कोणतेही कार्य करण्यास सक्षम होतो असे प्रतिपादन केले.शाळेचे प्राचार्य श्री. अन्वर शेख यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात शाळेच्या क्रीडा विभागाने गेल्या वर्षभरात गाठलेल्या यशस्वी टप्प्यांचा सविस्तर आढावा घेतला. त्यांनी पुढील शैक्षणिक वर्षापासून रायफल शूटिंग हा नवीन खेळ शाळेत सुरू करण्याची घोषणा केली, जी उपस्थितांकडून टाळ्यांच्या गजरात स्वीकारण्यात आली.या क्रीडा महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडा संचालक दीपक माने, क्रीडा शिक्षक पुरुषोत्तम सोळंके, वैशाली सोळंके, सचिन मंजुळे, शैक्षणिक विभाग प्रमुख धनंजय सोमवंशी, जीबी ऑगस्टन, सुनिता सुरवसे, अर्चना जाधव यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. शाळेचे क्रीडांगण विविध वयोगटातील स्पर्धकांच्या रंगतदार स्पर्धांनी गजबजून गेले होते. सर्व खेळाडू आपले कौशल्य पणाला लावून खेळत होते. पालकांनी खेळाडूंचे कौतुक केले.या प्रसंगी शाळेचे उपप्राचार्य राहुल कदम, विशेष अतिथी म्हणून गुरुकुल इंग्लिश स्कूलचे प्राचार्य शितल सर्वज्ञ आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये या क्रीडा महोत्सवाबद्दल मोठा उत्साह दिसून आला आणि विविध स्पर्धांमधून त्यांचे कौशल्य पाहायला मिळाले.

# परिवर्तनवादी सत्यशोधक कविसंमेलनाच्या अध्यक्षपदी प्रा.अरुण बुंदेले यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अमरावती । प्रतिनिधी**

२३ व्या राज्यस्तरीय महात्मा फुले सत्यशोधक साहित्य संमेलनाचे सर्वोदय शिक्षण समितीद्वारा संचालित महात्मा फुले हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,हिवरखेड आणि वऱ्हाड विकासाच्या वतीने २६ व २७ नोव्हेंबर २०२४ रोजी आयोजन केले आहे.परिवर्तनवादी कवी व अभंगकार प्रा.अरुण बाबारावजी बुंदेले यांची या २३ व्या राज्यस्तरीय सत्यशोधक महात्मा फुले साहित्य संमेलनातील परिवर्तनवादी सत्यशोधक कविसंमेलनाच्या अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आलेली आहे. त्यांच्या परिवर्तनवादी सत्यशोधक कवी संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या निवडीचा ठराव समाजभूषण प्रा.श्रीकृष्ण बनसोड यांनी बैठकीत मांडला. त्याला श्री साहेबरावजी पाटील,प्राचार्य रवींद्र वासनकर,वसंतराव तडस,पांडुरंग पाटील,वामनराव भडके,मदनलाल शर्मा,प्रकाशराव भोजने,अरविंद आमले,रमेशराव भोजने,मधुकर कवठकर,प्राचार्य श्रीमती एस.एस.दातीर तसेच वृक्ष मित्र व सामाजिक कार्यकर्ते नारायण मेंढे यांनी समर्थन दिले.



परिवर्तनवादी सत्यशोधक कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्रा.अरुण बाबारावजी बुंदेले यांचा उपेक्षित समाज महासंघाचे अध्यक्ष प्रा.श्रीकृष्ण बनसोड,कै.मौनाबाई बाबारावजी बुंदेले स्मृती प्रतिष्ठान च्या सचिव श्रीमती ज्योती पदमने,सदस्य श्री भगवान बुंदेले (माजी एपीआय ),श्री गणेश बुंदेले तथा कै.बाबारावजी वायलाजी बुंदेले राज्यस्तरीय शैक्षणिक पुरस्कार प्राप्त श्री शरद गढीकर,श्री विनोद इंगळे (अध्यक्ष,सत्यशोधक समाज समिती,अमरावती),गझलकार श्री देविलाल रौराळे विद्रोही कवी श्री प्रवीण कांबळे, श्री देवानंद पाटील तसेच वऱ्हाड विकास,डॉ.आंबेडकर समाज भूषण संघटना,महानायक संघटना,तथागत बुद्ध संघ आणि फुले-शाहू-आंबेडकरी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

आजपर्यंत प्रा.अरुण बुंदेले यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन,ग्रामीण दलित साहित्य संमेलनापासून तर ऑनलाईन कवी संमेलना पर्यंतच्या अनेक कवी संमेलनातील अध्यक्षपद,प्रमुख अतिथीपद भूषविले असून निमंत्रित कवी म्हणून अनेक समाजप्रबोधनपर परिवर्तनवादी काव्यरचनांचे अभिनयातून सादरीकरण केलेले आहे.ते विविध सामाजिक व साहित्यिक संस्थांचे अध्यक्ष, सदस्य असून वऱ्हाड विकास मासिकाचे सहसंपादक आहेत.

### प्रा.अरुण बुंदेले यांची ग्रंथसंपदा

**अभंगकार प्रा.अरुण बुंदेले यांची सामाजिक,शैक्षणिक व साहित्यिक विषयावरील निखारा व अभंग तरंग या दोन काव्यसंग्रहासह अकरा पुस्तके प्रकाशित झालेली असून चार पुस्तके प्रकाशनाच्या वाटेवर आहेत.त्यांची प्रकाशित झालेली ग्रंथसंपदा : –(१) आदर्श अभ्यास – पुस्तिका, (२) भद्याचं लगीन : हुंडाविरोधी एकपात्री,(३)शकुने ! आता आपलं कसं ? (एकांकिका), (४) दारूनं मेला ओ माय (एकांकिका),(५) नळावरची झोंबाझोंबी (एकांकिका),(६)हुंडा पापाचा हंडा (एकांकिका (७)आदर्श अभ्यासाचे तंत्र (८)आदर्श मार्गदर्शिका(९)आदर्श निबंध लेखन पुस्तिका (१०)निखारा (काव्यसंग्रह (११)अभंग तरंग (काव्य संग्रह प्रा.अरुण बुंदेले यांची शैक्षणिक प्रबोधन माला विविध शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गुणवृद्धीसाठी तर समाजातील विविध समस्यांवर प्रबोधन करणारी सामाजिक प्रबोधन माला व काव्य प्रबोधन माला सामाजिक संघटनांच्या माध्यमातून समाजासमोर ते सादर करतात.प्रा.अरुण बुंदेले यांच्या सामाजिक,शैक्षणिक व साहित्यिक कार्याचा गौरव दोन राष्ट्रीय व २२ राज्यस्तरीय पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.२३ व्या राज्यस्तरीय महात्मा फुले सत्यशोधक साहित्य संमेलनातील परिवर्तनवादी सत्यशोधक कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.**

# सुजात आंबेडकर यांचे गावंडे कुटुंबाला सांत्वन भेट



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांचे चिरंजीव जात आंबेडकर यांनी देगलूर येथे जाहीर सभेला जात असताना अंजनी येते गावंडे कुटुंबाला सांत्वन पर भेट देण्यात आली आहे वंचित बहुजन आघाडीचे बिलोली तालुका अध्यक्ष धम्मदीप गावंडे यांचे वडील दिनांक १५ ऑगस्ट २०२४ रोजी अल्पशा आजाराने नांदेड येथे एका खाजगी रुग्णालयामध्ये उपचारादरम्यान मृत्यू झाला होता त्यामुळे देगलूर बिलोली राखीव मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार सुशील कुमार देगलूरकर यांच्या प्रचाराला जात असताना दिनांक १३ नोव्हेंबर रोजी अंजनी येथे गावंडे कुटुंबाला सांत्वन पर सुजाता आंबेडकर यांनी भेट देऊन विचारपूस केले आहे यावेळी नांदेड लोकसभेचे उमेदवार ड अविनाश भोसिकर वंचित तालुका अध्यक्ष धम्मदीप गावंडे, गंगाधर कांबळे, दैवशिला डुमणे, भिवराबाई गावंडे, सुभाष गावंडे राजेंद्र गावंडे, संतोष जोंधळे, निलेश कापसे, अजय गावंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# निराधार बालकांचा बालदिन शिक्षकांकडून उबदार राहुल चातुर,कल्याण कोकाटे यांचा स्तुत्य उपक्रम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती । विवेकानंद फंड**




भारताचे माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मदिना निमीत्त पिंपरी दुमाला व खेडकर वस्ती रांजणगाव गणपती ता.शिरूर येथील प्राथमिक शिक्षक राहुल चातुर व कल्याण कोकाटे यांनी कासारी फाटा कोंढापुरी येथील गुरुकुल आश्रमातील २५ निराधार मुलांसाठी रजई,सोलापूरी चादर व उबदार कपड्यांचे वाटप करून आदर्श पद्धतीने बालदिन साजरा करून मुलांना मायेची उब दिली आहे.

हिवाळ्यामध्ये पडणाऱ्या कडाक्याच्या थंडीपासून आदिवासी भागातील शालेय मुलांचे संरक्षण व्हावे या हेतूने उपक्रमशील शिक्षक राहुल चातुर यांनी सन २०१४ मध्ये मायेची उब या नावाने स्वनिधीतून हा उपक्रम सुरू केला होता.दरम्यानच्या काळात शिरूर शिक्षक पतसंस्थेचे मा.सभापती कल्याण कोकाटे हे यामध्ये सहभागी झाले. यंदा या उपक्रमाचे दहावे वर्ष आहे. मागील दहा वर्षांमध्ये पुणे जिल्ह्यातील आंबेगाव,खेड,मावळ व राजगड या तालुक्यातील एकूण ९५० आदिवासी विद्यार्थ्यांना अशा प्रकारच्या स्लीपिंग किटचे वाटप करण्यात आले आहे. यासाठी शिरूर तालुक्यातील शिक्षक बंधू भगिनी,शिक्षक संघटना पदाधिकारी,ग्रामस्थ व पत्रकार बांधवांनी सहाय्य केले आहे.

यावर्षी सदर उपक्रमाचे अंतिम सांगता वर्षे आहे,त्या निमित्ताने पुणे जिल्ह्यातील सुमारे ३०० आदिवासी विद्यार्थ्यांना मायेची ऊब स्लीपिंग किट वाटप करण्याचे नियोजन आहे.समाजातील दानशूर व्यक्तींनी या सामाजिक कार्यासाठी मदत करण्याचे आवाहन मायेची ऊब परिवाराच्या उपाध्यक्ष मंगल लाळगे व सचिव ललिता भुजबळ यांनी केले आहे.निराधार मुलांना केलेल्या मदतीबद्दल गुरुकुल वसतिगृहाचे संचालक शिवाजी शिंदे यांनी संस्थेचे आभार मानले.शिरूर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी बाळकृष्ण कळमकर व शिक्षणविस्तार अधिकारी किसन खोडदे यांनी या सामाजिक उपक्रमाबद्दल शिक्षकांचे कौतुक केले आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन खंडेराव होळकर यांनी केले.

## ऐन निवडणूक काळात प्रशासन क्शन मोडवर

# परळी तालुक्यात पुन्हा गांजाची लागवड उघड : प्रशासनाकडून जप्तीची कारवाई

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**



परळी तालुक्यातील काही भागात गांजाची लागवड होण्याच्या घटनेने काही वर्षांपुर्वी खळबळ उडून दिलेली होती. एकेकाळी संपूर्ण देशात परळीची गांजाची शेती चर्चेत आली होती. त्यानंतर आता ऐन निवडणूक काळात महसूल व पोलीस प्रशासनाने संयुक्त कारवाई करत परळी तालुक्यातीलच नागपिंपरी शिवारात गांजाची लागवड पुन्हा उघड केली असून या ठिकाणी जप्तीची कारवाई करण्यात आली आहे.

मौ नागपिंपरी ता परळी वै जि बीड येथे गांजा जप्ती कारवाई करण्यात आली.अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन चे पीआय पडवळ ,एपीआय खोडेवाड, दिंद्रुड पो स्टे,बी. एल .रुपनर नायब तहसीलदार, तलाठी मंडळ अधिकारी व ईतर २५-३० पोलीस कर्मचारी यांची संयुक्त कारवाई करत गांजा जप्तीची कारवाई केली आहे. २०किलो ७७०ग्राम एवढा ओला व सुका गांजा जप्त करण्यात आला आहे.पुढील कारवाई पोलीस करत असुन अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरु आहे.


# संजीव अहिरे यांना वसुनंदिनी फाऊंडेशन जळगाव यांचा जिवन गौरव तर माणूसकी मल्टीपर्पज फाऊंडेशन मलकापूर यांचा आदर्श समाज रत्न पुरस्कार जाहिर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक सिडको येथील सांस्कृतिक सामाजिक सेवानिवृत्त प्रेस कर्मचारी संजीव काशिनाथ अहिरे यांना एकाच महिण्यात दोन राज्यस्तरीय पुरस्कार जाहिर झाल्याचे समजताच सर्वत्र आनंद व्यक्त होत आहे.

८ डिसेंबर २०२४ रोजी जळगाव येथील ख्यातनाम वसुनंदिनी फाऊंडेशन यांचा जिवन गौरव तर मलकापूर जि. बुलडाणा येथील प्रथितयश माणूसकी मल्टीपर्पज फाऊंडेश यांचा १५ डिसेंबर २०२४ रोजी आदर्श समाज रत्न पुरस्कार जाहिर झाल्याचे, तशा आशयाचे दोन्ही संस्थाचे निवडपत्र नुकतेच प्राप्त झाले आहे.




या आधी श्री संजीव अहिरे यांना राज्यशासनाच्या कामगार मंडळाचा गुणवंत कामगार पुरस्कार देऊन सन्मानित केले गेले आहे.

इतरही विविध क्षेत्रातल्या सामाजिक संस्थांनी त्यांना अनेक पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. सध्या ते सेवानिवृत्त असुन देखील विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून शासणाने त्यांची नियुक्ती केली आहे. वृक्षसंवर्धन , व्यसनमुक्ती , कवीसंमेलन , जेष्ठ नागरीक संघ, ग्राहक मंच एक ना अनेक सामाजिक विधायक कार्यक्रम आयोजित करण्यात त्यांचा हातखंड आहे. त्यांना जाहिर झालेल्या पुरस्काराचे कवी लेखक संपादक साहेबराव तात्या नंदन , ज्ञानसिंधुचे तान्हाजी खोडे, भास्कर नाना नंदन , कवी सुभाष उमरकर, कवी संजय अहिरे बाळासाहेब गीरी यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

# आद्य क्रांतिकारक गुरू वीर लहुजी वस्ताद साळवे २३० वी जयंती फुले नगर,लहुजी वस्ताद साळवे चौक येथे मोठ्या उत्साहात साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी येथील १३२ के.व्ही.च्या समोर नगर हावे रोड लगत आद्य क्रांतिकारी गुरू लहुजी वस्ताद साळवे २३० वी जयंती फुले नगर,लहुजी वस्ताद साळवे जयंती उत्सव निमित्त प्रमुख उपस्थिती म्हणून सागर आप्पा धस,युवानेते शामभैया धस, नगराध्यक्ष जिया भाई बेग यांच्या हस्ते आद्य क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या प्रतिमेला पुष्प हार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले यावेळी जेष्ठ नेते लालासाहेब शिंदे,बन्सी वाल्हेकर,बाजीराव वाल्हेकर,शोषित विकास संघटना महाराष्ट्र राज्य अध्यक्ष पांडुरंग खवळे,शोषित विकास संघटना राज्य उपाध्यक्ष नागेश डाडर,

शोषित विकास संघटना महाराष्ट्र राज्य सचिव भगवानराव भोसले,माजी जिल्हा परिषद सदस्य नवनाथ चाखाले,ज्येष्ठ नेते हौसराव वाल्हेकर,जेष्ठ नेते रमेश पवळे, नगरसेवक शाम वाल्हेकर,शोषित विकास संघटना तालुका अध्यक्ष जालिंदर गायकवाड,माजी नगरसेवक ज्ञानदेव वाल्हेकर,शोषित विकास संघटना आष्टी तालुका शहर अध्यक्ष,माजी ग्रा.पं.'सदस्य'संतोष रणसिंग,डॉ.बेग मिर्झा,युवा पत्रकार तालुका अध्यक्ष अविनाश कदम,पुरोगामी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष अण्णासाहेब साबळे,सचिन गाडे,शोषित विकास संघटना उपाध्यक्ष युवा आकाश वाल्हेकर,शुभम वाल्हेकर,आकाश पवळे,शोषित विकास संघटना युवा तालुका अध्यक्ष गोकुळ वाल्हेकर, रवींद्र वाल्हेकर,शोषित विकास संघटना तालुका उपाध्यक्ष अनिल रणसिंग,युवानेते संदिप बन्सी वाल्हेकर,सागर वाल्हेकर,पप्पू वाल्हेकर,ओंकार पवळे,शंकर रणसिंग,अनिकेत वाल्हेकर,बालानंद महाराज,अमोल पवळे,दिपक वाल्हेकर,लक्ष्मण वाल्हेकर,अनुज लालझरे,राज बावरे,शिवम वाल्हेकर,रिया वाल्हेकर,गोरख पवार,सुरज वाल्हेकर,सुशांत वाल्हेकर,मयुर वाल्हेकर, अविनाश कांबळे,साईनाथ वाल्हेकर, भाऊसाहेब शिरोळे,भाऊसाहेब कांबळे,आदी समाज बांधव लहुजी भक्त,अण्णाभाऊ साठे मित्र मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904